# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.०६/०५/२०२४

**निवडणूकीतील लोकशाही बळकट करण्याकरिता रांगोळी स्पर्धेचे आयोजन**

आगामी लोकसभा निवडणूक २०२४ करिता २२ पालघर मतदार संघात समाविष्ठ असलेल्या १३२ नालासोपारा विधानसभा मतदार संघात मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान होण्यासाठी जनजागृती करिता SVEEP पथक तयार करण्यात आले आहे.

सदर SVEEP पथकामार्फत १३२- नालासोपारा विधानसभा मतदार संघात विविध ठिकाणी, शाळा, सिनेमागृह, सर्वशासकीय, निमशासकीय, महामंडळे, सहकारी संस्था, बसस्थानके, शहरातील चौक व गर्दीची ठिकाणी मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्याचे आदेश मा.जिल्हाधिकारी सो. पालघर यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त आदेशानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती A, बोळींज येथिल नविन विवा कॉलेज, विरार (प.) येथे शनिवार, दि.०४/०५/२०२४ रोजी सकाळी १२:०० वाजता भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर रांगोळी स्पर्धेत मोठ्या प्रमाणात स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या रांगोळी स्पर्धेत **“निवडणूकीतील लोकशाही बळकट करणे”** या विषयावर आलेल्या स्पर्धकांनी विविध प्रकारच्या रांगोळ्या काढण्यात आल्या व विविध प्रकारे निवडणूकी बाबत जनजागृती करण्याचे घोषवाक्य नमूद करून मोठ्या प्रमाणात मतदान करा असा संदेश देण्यात आला. सदर रांगोळी स्पर्धेत मोठ्या प्रमाणात स्पर्धकांनी सहभाग घेतला होता त्या पैकी ३ स्पर्धकांना विजेता घोषित करण्यात आले.त्यात प्रथम क्रमांकावर श्री.गणेश सोलंकी, द्वितीय क्रमांक श्रीम.संगिता गुल्हाने व तृतिय क्रमांक श्री.स्वप्निल सोनावणे यांना अनुक्रमे रक्कम रू. ५०००/-, रू. ३०००/- व रू.२०००/- रोख रक्कम, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

भव्य रांगोळी स्पर्धा या कार्यक्रमात मा.सहा.निवडणूक निर्णय अधिकारी, श्री.शेखर घाडगे, मा.उपायुक्त तथा नोडल अधिकारी, श्री.समीर भूमकर, मा.उपायुक्त तथा नोडल अधिकारी, श्रीम. विशाखा मोटघरे, परिक्षक सौ.अंकिता नाईक तसेच SVEEP पथकातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका